**शैक्षणिक संदर्भ अंक १३८ ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२२**

महा इतिहास - भाग २०

# वर्तमानाची पायाभरणी - २

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

महा इतिहास - भाग २०

# वर्तमानाची पायाभरणी - २

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

*मागच्या लेखापासून वर्तमान मानवी समाजव्यवस्थेचा पाया कसा रचला गेला हे आपण पाहत आहोत. इ.स. ८०० ते १२०० दरम्यान मध्ययुगीन उष्म्याच्या कालखंडाने मानवी जगतात भरभराट निर्माण केली व जग जवळ आणले. पण जगभरातील माणसांचा वाढता संपर्क १४व्या शतकातील महाभयंकर प्लेगच्या साथींना कारणीभूत ठरला. यामुळे जगाची लोकसंख्या तर कमी झालीच पण आर्थिक भरभराटीलाही खीळ बसली, हे आपण मागच्या लेखात पाहिले.*

१३५० नंतर जगभरातील मानवी समाज संकटांमधून सावरू लागले. पुन्हा एकदा व्यापारउदीम नव्या जोमाने वाढू लागला. यापूर्वी आफ्रो-युरेशियामधील घडामोडी या अमेरिका व ऑस्ट्रेलिया खंडांतील घडामोडींपासून अलिप्त होत्या. पण १३५० पासून १७व्या शतकापर्यंत हे चित्र झपाट्याने बदलले. या काळात मानवी इतिहासात प्रथमच संपर्कांचे जाळे पृथ्वीव्यापी बनले आणि अर्थातच सामूहिक ज्ञाननिर्मितीचा झपाटाही त्यामुळे वाढला. यामध्ये चिनी व युरोपीयन दर्यावर्द्यांनी व्यापारानिमित्त केलेल्या समुद्री सफरींचा महत्त्वाचा वाटा होता. लांबवर प्रवास करू शकणाऱ्या जहाजांच्या निर्मितीचे, तसेच लांबवरच्या समुद्री सफरींमध्ये आवश्यक दिशादर्शनाचे तंत्रज्ञान व कौशल्य या वेळपर्यंत विकसित झालेले होते, म्हणूनच हे शक्य झाले.

चीनमधील मिंग वंशाच्या सम्राट यॉंगल यांनी १५व्या शतकाच्या सुरूवातीच्या कालखंडात सात समुद्र सफरींचे आयोजन केले. या समुद्र सफरींचे नेतृत्व ॲडमिरल झेंग हे

या मुसलमानधर्मीय तृतीयपंथी व्यक्तीने केले. या समुद्र सफरींद्वारे चीनने हिंद महासागरातील



*ॲडमिरल झेंग हे यांचा चीनमधील संग्रहालयातील मेणाचा पुतळा (स्रोत – विकीपिडिया)*


जावा व सुमात्रापर्यंत व्यापारी संबंध प्रस्थापित केले. यापैकी काही मोहिमा श्रीलंकेत व भारताच्या पूर्व किनाऱ्याने वर अगदी गंगेच्या मुखापर्यंतही गेल्या. काही जहाजे श्रीलंका ओलांडून मालदीव तसेच भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकतपर्यंत पोहोचली. पुढे मध्य आशिया व आफ्रिकेच्या पूर्व किनारपट्टीवरील मोगादिशूपर्यंतचाही पल्ला त्यांनी गाठला. परंतु सम्राट यॉंगल यांच्या निधनानंतर ह्या समुद्रसफरी थांबवण्यात आल्या.

चिनी जहाजांची क्षमता व खलाशांचे कौशल्य पहाता आफ्रिकेला वळसा घालून अमेरिकेपर्यंतही त्यांची जहाजे पोहचू शकली असती. पण चिनी सम्राटांच्या दृष्टीने असे करणे मूर्खपणाचे ठरले असते, कारण या सात समुद्रसफरींमधून मिळालेला पैसा आणि त्यांना आलेला खर्च याचा मेळ बसला नव्हता. अशा परिस्थितीत आणखी दूरवरच्या सफरी करणे आतबट्ट्याचे ठरले असते.

चिनी साम्राज्यच मुळात अतिशय मोठे व नैसर्गिक संसाधनांनी परिपूर्ण होते. त्यांच्या आजूबाजूच्या तितक्याच समृध्द बाजारपेठा असलेल्या आशियाई देशांशी व्यापारी जाळे प्रस्थापित झाल्यावर त्यापलीकडे पाहण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. त्यांना त्यांच्या आसपास कोणी सागरी शत्रूही नव्हते, त्यामुळे लष्करी आरमारावर फार खर्च करण्याचीही त्यांना आवश्यकता वाटली नाही.

अशीच काहीशी परिस्थिती जगाच्या इतरही काही भागांमध्ये होती. अमेरिकेतील ॲझटेक साम्राज्य १५व्या शतकात प्रस्थापित झाले. येथेही मोठी तांत्रिक प्रगती झालेली होती. पण अतिशय संपन्न असलेल्या या विशाल साम्राज्याला व्यापारउदीमासाठी सागरी मोहिमा आखून अज्ञाताचा वेध घेण्याचे काहीच कारण नव्हते. भारतीय उपखंडातही अंतर्गत समृध्दीमुळे इतर जगाचा वेध घेण्याची गरज फार कोणा राज्यकर्त्यांना वाटली नाही. मध्य आशियातील ऑटोमान साम्राज्याच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. हे साम्राज्य १३व्या शतकात उस्मान नावाच्या सम्राटाने स्थापन केले होते. ब्लॅक डेथच्या झटक्यांनंतर या साम्राज्याचा चहुदिशांनी विस्तार झाला आणि या सम्राटांनाही सागरी मोहिमा आखण्याची गरज भासली नाही.

युरोपातील परिस्थिती मात्र या साऱ्यापेक्षा वेगळी होती. आफ्रोयुरेशियातील व्यापारी जाळयांच्या उत्तर सीमेवरचा हा भाग होता. युरोपात ब्लॅक डेथनंतर लोकसंख्या कमी होऊन अर्थव्यवस्थाही दुर्बल झालेली होती. यातून अनेक छोटी-छोटी राज्ये उभी राहिली होती. त्यांच्यात एकमेकांशी स्पर्धा होती आणि आजूबाजूला संसाधनांची कमतरता होती. येथील समाज ख्रिश्चनधर्मीय होता आणि आफ्रिका व आशियाशी व्यापाराचे खुष्कीचे मार्ग मुस्लीमधर्मीय ऑटोमान साम्राज्याने अडवलेले होते. अशा परिस्थितीत तगण्यासाठी आणि आपला व्यापारउदीम वाढवण्यासाठी समुद्री मार्गांचा धांडोळा घेणे हाच त्यांच्यापुढील व्यवहार्य पर्याय होता. मुस्लीमांना शह देण्यासाठी ख्रिश्चनांची संख्या वाढवणेही युरोपीयन शासकांना महत्त्वाचे वाटत होते. त्यामुळे अर्थकारण व धर्मप्रसार या प्रेरणांमधून युरोपातील वेगवेगळया शासकांनी भारत व आफ्रिकेच्या समृध्द बाजारपेठांपर्यंत पोहचण्यासाठी सागरी मार्गांनी मोहिमा आखायला सुरूवात केली.




*ऑटोमान साम्राज्याची व्याप्ती (स्रोत – विकीपिडिया)*

पोर्तुगीजांनी आफ्रिकेच्या पश्चिम किनारपट्टीच्या कडेकडेने येऊन, केप ऑफ गुड होपला वळसा घालून आफ्रिकेच्या पूर्व किनारपट्टीवरील व सरतेशेवटी भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील व्यापारी बंदरांपर्यंत पोहोचण्याचा समुद्री मार्ग विकसित केला. स्पेनच्या सम्राटांच्या आर्थिक सहकार्यातून ख्रिस्तोफर कोलंबसने भारतापर्यंत पोहचण्याचा वेगळा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. पण तो अमेरिका खंडात जाऊन पोहोचला. १७व्या शतकात पोर्तुगीज व स्पॅनिश दर्यावर्दी ऑस्ट्रेलिया खंडातही जाऊन पोहोचले. पण तिथे अजूनही भटक्या टोळ्या वावरत असल्याने देवाणघेवाणीवर आधारित व्यापारउदीम प्रस्थापित करण्यासारखी परिस्थिती नव्हती. ऑस्ट्रेलिया खंडाचे युरोपपासूनचे अंतरही खूप जास्त होते.

या साऱ्या सागरी मोहिमांसाठी युरोपीयन दर्यावर्दींनी शिडाची गलबते वापरली व ऋतुमानाप्रमाणे बदलणाऱ्या नैसर्गिक वाऱ्याच्या प्रवाहांचा हुशारीने वापर केला. युरोपीयनांच्या समुद्रमार्गे व्यापारात पृथ्वीच्या भौगोलिक रचनेमुळे निर्माण झालेल्या वाऱ्याच्या विशिष्ट आकृतीबंधांचा इतका महत्त्वाचा वाटा होता की या वाऱ्यांनाच व्यापारी वारे (ट्रेड विंड्स) म्हणून ओळखले जाते. पृथ्वीच्या भौगोलिक जडणघडणीचा इतिहास आणि माणसांचा इतिहास एकमेकांशी कसे जुळलेले आहेत याचे हे एक उदाहरण.



*कालिकतच्या राजदरबारात वास्को द गामा. पोर्तुगीज चित्रकार व्हेलोसो सालगाडो (१८६४-१९९५) यांनी काढलेले तैलचित्र (स्रोत – विकीपिडिया)*

१५१९ मध्ये फर्डिनांड मॅजेलान हा पोर्तुगीज दर्यावर्दी स्पेनच्या सम्राटांच्या आर्थिक मदतीने पाच जहाजे घेऊन सागरी मोहिमेला निघाला. अमेरिका खंडाच्या दक्षिणेकडून त्याने

पॅसिफिक समुद्र पार केला. १५२१ मध्ये फिलिपाईन्समध्ये मॅजेलान मृत्युमुखी पडला पण त्याचा सहकारी डेल कानो हा १५२२ मध्ये एका जहाजानिशी स्पेनला पोहोचला. या साऱ्या सफरीत सहभागी होता पांगलिमा अवांग नावाचा मलेशियातून स्पेनमध्ये आणलेला एक गुलाम. दुभाषाचे काम करण्यासाठी त्याचा ह्या मोहिमेत समावेश करण्यात आला होता. या मोहिमेनंतर हा गुलाम परत आपल्या घरी परतला. समुद्रमार्गे पहिली पृथ्वीप्रदक्षिणा करण्याचे श्रेय मॅजेलानला दिले जाते, पण खऱ्या अर्थाने हे करणारा अवांग हा पहिला माणूस होता.

युरोपीयनांना आफ्रिका व आशियामधील समृध्द संसाधने हवी होती. पण आफ्रिका व आशियातील संपन्न समाजांना युरोपीयनांकडून काहीच नको होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही अतिशय चाणाक्षपणे युरोपीयनांनी व्यापारी जाळे निर्माण केले आणि त्यात आपले स्थान वरचढ राहील याचीही तजवीज केली. त्यांना हे करता आले कारण ज्या ज्या भागात युरोपीयन दर्यावर्दी पोहचले तिथे तिथे त्यांनी अंतर्गत कलहांचा फायदा उचलला. शेजार-शेजारच्या राजे व उमरावांमधील किरकोळ भांडणांच्या आगीत तेल ओतून त्यांनी आपल्याजवळील दारूगोळयाच्या शस्त्रांचे तंत्रज्ञान व लष्करी कौशल्ये या गोष्टी आफ्रिकी व आशियाई राज्यकर्त्यांसाठी मौल्यवान बनवल्या. कधी एका राज्यकर्त्याला तर कधी त्याच्या प्रतिस्पर्ध्याला मदत करून दोन्ही बाजूंकडून व्यापाराचे हक्क व स्वस्त किंमतींची हमी मिळवायची, हे त्यांचे तंत्र होते. आशिया व आफ्रिका येथून अतिशय स्वस्तात संसाधने (आणि गुलामही) खरेदी करायची व युरोपात चढ्या दराने विकायची, यातून युरोपीयन व्यापाऱ्यांसाठी प्रचंड नफा कमावून देणारी एक जागतिक अर्थव्यवस्था उभी राहिली.

यामध्ये प्रथम पोर्तुगीज आघाडीवर होते. १६व्या शतकाच्या सुरूवातीला हिंदी महासागरात त्यांनी आपले व्यापारी व राजकीय वर्चस्व उभे केले. पूर्व आफ्रिकेच्या

किनारपट्टीवर किलवा, इराणच्या खाडीवरील होर्मुझ, भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर गोवा आणि पूर्व आशियात मलाका येथे त्यांनी लष्करी ठाणी उभारली. मात्र १७व्या शतकात आधी डच व नंतर ब्रिटीश व्यापाऱ्यांनी पोर्तुगीजांना या भागातून हद्दपार केले.

डच व ब्रिटिश या दोघांच्याही राजाश्रयातून उभ्या राहिलेल्या, मजबूत लष्करी पाठबळ असलेल्या आणि आमिर-उमरावांची भरघोस आर्थिक गुंतवणूक असलेल्या 'ईस्ट इंडिया कंपनी' होत्या. हे जगातले पहिले आंतरराष्ट्रीय उद्योग होते. डचांनी दक्षिणपूर्व आशिया व इंडोनेशियातून पोर्तुगीजांची हकालपट्टी केली तर ब्रिटिशांनी भारतीय उपखंडातून. या साऱ्या घडामोडींमध्ये स्थानिक राजकारणात युरोपीयनांची ढवळाढवळ वाढत गेली. तरीही जवळजवळ १८व्या शतकापर्यंत ही सारी व्यापारी मोहीमच होती, त्यात युरोपीयन राजदरबारांचा राजकीय हस्तक्षेप नव्हता.



*ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्याचे अंदाजे १७६० मधील चित्र (स्रोत – विकीपिडिया)*

अमेरिकेत मात्र युरोपीयन लोक व्यापारी म्हणून नाही तर आक्रमक योध्दे बनून पोहचले. स्पॅनिश लोकांनी उत्तर अमेरिकेत तर पोर्तुगीजांनी दक्षिण अमेरिकेत स्थानिक समूहांना देशोधडीला लावून वसाहती स्थापन केल्या व आपल्या साम्राज्यांचा विस्तार करून तेथील संसाधनांवर थेट ताबा प्रस्थापित केला. कदाचित आफ्रिका व आशियामधील समाजांच्या तुलनेने अमेरिका खंडातील समाज कमी प्रगत होते, लोकसंख्या कमी होती, व स्थानिक समूहांची परस्परांमधली संपर्कजाळी कमकुवत होती. त्यामुळे त्यांना थेट बाजूला

हटवणे युरोपीयन लोकांना सोपे गेले असावे. १८व्या शतकापासून पुढे युरोपीयनांनी ऑस्ट्रेलिया खंडातही मूळच्या रहिवाशांना बाजूला सारून आपल्या वसाहती स्थापन केल्या.

थोडक्यात म्हणजे जगाच्या संसाधन-समृध्द भूभागांमधील समाज आत्मसंतुष्ट होते. युरोपात नसलेली संसाधन-सुरक्षितता प्राप्त करून घेण्यासाठी युरोपीयन लोक साहसवादी बनले. जिथे जिथे संपन्नता दिसली तिथे तिथे त्यांनी साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा उपयोग केला आणि संसाधनांवर ताबा प्रस्थापित केला. पण या घडामोडींचा एक परिणाम म्हणजे १७व्या शतकाच्या अखेरपर्यंत माणूस - होमो सेपियन - ही संपूर्ण जगभरात पसरलेली, सर्व नैसर्गिक परिसंस्थांमध्ये तगणारी आणि जगभरात पसरलेले संपर्कजाळे असलेली पृथ्वीवरील एकमेव प्रजाती बनला.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी – बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: चिनी दर्यावर्दी, युरोपीयन दर्यावर्दी, ओटोमान साम्राज्य, पोर्तुगीज, स्पॅनिश, वास्को द गामा, कोलंबस, मॅजेलान, युरोपीयन वसाहतवाद, ईस्ट इंडिया कंपनी)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***